स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

(इ.स.२००० ते २०२०)

: संशोधक :

पाटील शितल विनायकराव

: मार्गदर्शक :

प्रा.डॉ.म.ई. तंगावार

मराठी विभाग

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

:संशोधन केंद्र:

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर

जुलै २०२१

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य : स्वरूप आणि चिकित्सा

(इ.स.२००० ते २०२०)

प्रस्तावना

कर्नाटकातील सीमाभागात मराठी भाषिकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. विशेषतः बीदर, गुलबर्गा या परिसरातील मराठी माणसांनी स्थापन केलेल्या विविध संस्था व संघटना यामुळे मराठी भाषिकांना लेखनासाठी एक प्रकारची प्रेरणा मिळाली. सीमा भागातील शिक्षण संस्था व सामाजिक संस्थांमुळे मराठी साहित्यिकांची जडणघडण काही प्रमाणात झालेली आहे, हे आपणास नाकारता येत नाही. विसाव्या शतकातही अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून सीमाभागातील कर्नाटकातील जाणीवा प्रकट केलेल्या दिसून येतात. तसे पाहिले तर गुलबर्गा (कलबुर्गी), धारवाड, बेळगाव येथील विद्यापीठांमध्ये मराठी हा विषय आहे. माध्यमिक स्तरावरही मराठीचे शिक्षण दिले जाते. या कारणामुळे अनेक विद्यार्थ्यांनी कर्नाटक सीमाभागात शिकत असताना व शिकल्यानंतरही मराठी भाषेविषयीचा ओलावा कायम ठेवलेला दिसून येतो. त्यामुळे मागच्या अनेक वर्षापासून मराठी साहित्य व संस्कृतीची जोपासना सीमावर्ती कर्नाटकातील साहित्य समीक्षकांनी जोपासलेली आहे.

भाषावार प्रांतरचनेमुळे मराठी भाषिकांची विभागणी झाली. कर्नाटकातील बीदर, गुलबर्गा या परिसरामध्ये मराठी भाषिक आजही सातत्याने मराठी भाषेत लेखन करत आहेत. गुलबर्ग्याहून 'अनुबंध' व 'माझी मराठी' ही नियतकालिके काढली जातात. 'माझी मराठी' हे त्रैमासिक कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेचे महत्त्वाचे असे मुखपत्र आहे. याशिवाय वेगवेगळ्या शिक्षणसंस्थाही आहेत. भालकी येथे महाराष्ट्र बसव परिषदेच्या वतीने मराठीत अनेक ग्रंथ प्रकाशित करण्यात आलेले आहेत. त्यातील बहुतांश लेखक हे सीमावर्ती भागातील आहेत. बीदर, गुलबर्गा या

परिसरामध्ये अनेक कवी संमेलन, बहुभाषिक लेखक मेळावे घेतले जातात. कर्नाटकातील मराठी भाषाप्रेमी साहित्यिक यात आनंदाने सहभाग नोंदवतात. कर्नाटकातील काही वरिष्ठ महाविद्यालयात मराठी साहित्याचे ग्रंथालय देखील समृद्ध आहेत. या सर्व कारणांमुळे मराठी लेखकांना साहित्याच्या बाबतीत एक अनुकूल असे पर्यावरण निर्माण झाले.

भालचंद्र शिंदे, यशवंतराव सायगांवकर, दयानंद बिरादार, माधव कदम, इंदुमती सुतार, शकुंतला सोनार, कमला वाघमारे, गुरया स्वामी, बाबुराव गायकवाड अशी कितीतरी साहित्यिकांची नावे सांगता येतील. याशिवाय अनेक नवोदित साहित्यिक आपल्या लेखणीच्या माध्यमातून सीमावर्ती कर्नाटकातील संस्कृती व समस्येवर प्रकाश टाकत आहेत. भालचंद्र शिंदे यांची ‘न हारवलेला योद्धा’, ‘विचारवलये’, यशवंतराव सायगांवकर यांची ‘महाराष्ट्र-कर्नाटक सीमालढ्याचा इतिहास’, ‘मी माय अन् बरेच काही’, माधव कदम यांची ‘खुरूप’ अशा प्रकारचे दर्जेदार साहित्य आणि साहित्यकार आपणास पाहण्यास मिळतात.

कर्नाटकातील सीमावर्ती मराठी साहित्य या विषयावर संशोधन करीत असताना एकविसावे शतक व गुलबर्गा आणि बीदर जिल्हा अशी मर्यादा घालून घेतलेली आहे. बीदर जिल्ह्यातील भालकी, बसवकल्याण, औराद, हुमनाबाद व गुलबर्गा जिल्ह्यातील आळंद, चिंचोली, चित्तापूर, जेवरगी, सेडम या तालुक्यांप्रमाणे ग्रामीण भागात देखील अनेक साहित्यिक आहेत. त्यामध्ये बहुतांश साहित्यिकांचे साहित्य हे अप्रकाशित आहे. विशेष करून १९५१ च्या जनगणनेनुसार भालकी तालुक्यातील ५९ टक्के व औराद तालुक्यातील एकूण ६९ टक्के लोक मराठी भाषिक आहेत. कमलनगर जवळील होळसमुद्र या गावामध्ये मध्ययुगीन काळात कोरला गेलेला मराठीचा शिलालेख आपल्याला पहावयास मिळतो. अशी कितीतरी गावे आहेत जिथे लोक मराठी भाषेत संवाद साधताना दिसतात. कागदोपत्री जरी त्यांची भाषा कन्नड असली तरी

व्यवहाराची भाषा मराठीच आहे. एकंदरीत सीमावर्ती कर्नाटकातील मराठी भाषिकांचे सृजनात्मक साहित्य, त्यांच्या साहित्याचे वेगळेपण, त्या साहित्यातील जाणिवा, त्यातील भाषिक सौंदर्य इत्यादींचा शोध घेण्याच्या उद्येशाने हा विषय निवडला आहे. सीमावर्ती कर्नाटकातील मराठी भाषिक व साहित्यिक आजही महाराष्ट्रातील राजकीय साहित्यिक लोकांविषयी खंत व्यक्त करतात की, महाराष्ट्रातील लोकांचे आमच्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. असे असले तरी मराठी भाषा व साहित्यावरील त्यांचे प्रेम अजूनही कमी झालेले नाही.

संशोधनाचे महत्त्व

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी भाषिक कर्नाटकात असले तरी त्यांची मातृभाषा मराठीच आहे. अतिशय प्रामाणिकपणे ते मराठी भाषेचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात करत असतात. कर्नाटकातील मराठी माणसांची संस्कृती, त्यांना आलेले अनुभव, त्यांच्या व्यथा लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातील आधुनिक मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनी मात्र याची फारशी दखल घेतलेली नाही. कर्नाटकातील मराठी साहित्याची नोंद घेतल्यास मराठी साहित्य आणखी समृद्ध होईल यात शंका नाही. कुठेतरी या सर्व साहित्यिकांचे साहित्य समजावून घेतले पाहिजे, असा प्रयत्न संशोधनाच्या बाबतीत फारसा झालेला दिसून येत नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनात या विषयाला महत्त्व आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्याला तसे पाहिले तर फार जुनी परंपरा आहे. मराठीतील अगदी सुरुवातीच्या काळातला शिलालेख हा श्रवणबेळगोळ म्हणजेच कर्नाटकमध्येच आहे. त्यानंतरही मध्ययुगीन काळात काही प्रमाणात लेखन झालेले

असले तरी विशेषतः विसाव्या शतकामध्ये महत्त्वाचे लेखन झालेले आहे. एकविसाव्या शतकातही हे लेखन चालूच आहे. त्यामुळे संशोधनासाठी २००० ते २०२० अशी मर्यादा घालून घेतली आहे. त्याही बीदर व गुलबर्गा या दोन जिल्ह्यातील साहित्यिकांचा विचार केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये समीक्षा व अनुवादित साहित्याचा समावेश नाही. तर केवळ सृजनात्मक साहित्याचा विचार केला जाणार आहे. त्यात विविध वाङ्मय प्रकारातील महत्त्वाच्या साहित्यिकांची जडणघडण, त्यांच्या लेखनामागची प्रेरणा व त्यांचे साहित्य अशा प्रकारे संशोधन केले जाईल.

संशोधनाची उद्दिष्टे

'सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य स्वरूप आणि चिकित्स (इ.स.२००० ते २०२०' या संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य संस्कृतीचा तसेच चळवळीचा शोध घेणे.

२) एकविसाव्या शतकातील सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्याच्या प्रेरणा समजून घेणे.

३) कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्याचे स्वरूप लक्षात घेणे.

४) कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्याचे बलस्थाने व मर्यादांवर प्रकाश टाकणे.

५) कर्नाटक सीमाभागातील मराठी साहित्यातील मूल्ये व सौंदर्यस्थळांचा शोध घेणे.

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत विषयावर संशोधन करत असताना खालील गृहितके मांडण्यात आलेली आहेत.

१) सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्याची परंपरा समृद्ध आहे.

२) सीमावर्ती कर्नाटकात एकविसाव्या शतकातही अनेक छोटे-मोठे संमेलने होत असतात. त्यातून लेखकांना एक प्रकारची ऊर्जा मिळते.

३) सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य समीक्षकांच्या दृष्टीने दुर्लक्षित आहे.

४) सीमावर्ती कर्नाटकातील साहित्यिकांनी मराठी साहित्य व संस्कृतीची जोपासना केली.

५) आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य खूप महत्त्वाचे आहे.

६) सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्याच्या जडणघडणीत कर्नाटकातील वाङ्मयीन नियतकालिकांचे योगदान आहे.

संशोधन पद्धती

'सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य (इ.स.२००० ते २०२०' या शोधप्रबंधासाठी विशेषतः विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. अनेक साहित्यिकांचे साहित्य अप्रकाशित आहे. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांची मुलाखत घेणे तसेच विविध वृत्तपत्र व नियतकालिकांच्या माध्यमातून त्यांच्या साहित्याचे स्वरूप समजावून घेतले जाईल.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य व संस्कृती

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्याला फार जुनी परंपरा आहे. मराठीतील पहिला शिलालेख हा श्रवणबेळगोळ म्हणजेच कर्नाटक मधलाच आहे. मध्ययुगीन काळातही साहित्य लेखन झालेले दिसून येते आणि एकविसाव्या शतकातही लिखाण होत आहे. सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्यातून मराठी संस्कृतीची होत असलेली जोपासना दिसून येते आणि त्याआधारे त्याचे स्पष्टीकरण या प्रकरणातून करावयाचे आहे.

प्रकरण दुसरे

सीमावर्ती कर्नाटकातील कथात्म साहित्य

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्यामध्ये कथात्मक साहित्याचाही बराच मोठा वाटा असलेला दिसून येतो. कादंबरीकारांचे प्रमाण कमी असले तरी अनेक लेखकांच्या कथा आहेत. याचा विचार प्रस्तुत प्रकरणात केला जाईल.

प्रकरण तिसरे

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी कविता

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्यामध्ये कवितेचा मोठ्या प्रमाणात वाटा आहे. सीमावर्ती भागामध्ये अनेक कविसंमेलने भरवली जातात आणि त्यांच्या माध्यमातून अनेक नवनवीन कवींचा उदय होताना दिसून येतो. वीस वर्षातील कवींची कविता, त्यातील आशय व वेगळेपण यावर प्रकाश टाकला जाईल.

इंदुमती सुतार यांचा कवितासंग्रह ‘हिरवी पहाट’ हे एक उदाहरण घेता येईल. कवितेच्या माध्यमातून अनेक कवी-कवयित्रींनी आपल्या मनाचा समाजाचा उलगडा

कवितेच्या माध्यमातून उलगडताना दिसून येते. त्यांचाच सविस्तर अभ्यास या प्रकरणातून करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी वैचारिक साहित्य

सीमावर्ती कर्नाटकात मराठी वैचारिक साहित्य देखील लिहिले गेले आहे. त्यात यशवंतराव सायगांवकर यांचा मोलाचा वाटा दिसून येतो. त्यांच्या अनेक साहित्यकृती या वैचारिकदृष्ट्या संपन्न असलेल्या दिसून येतात. 'महाराष्ट्र-कर्नाटक सीमालढ्याचा इतिहास' या आणि इतर बऱ्याच साहित्यकृतींचा अभ्यास या प्रकरणातून करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी स्फूटलेखन

सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्यामध्ये स्फूट लेखनाचाही वाटा असलेला दिसून येतो. यामध्ये चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन अशा अनेक प्रकारचे स्फूटलेखन सीमावर्ती कर्नाटक मराठी साहित्यात झालेले दिसून येते. या सर्वांचा चिकित्सकपणे अभ्यास या प्रकरणातून करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्षात्मक समारोप

'सीमावर्ती कर्नाटकातील मराठी साहित्य स्वरूप आणि चिकित्सा (इ.स.२००० ते २०२०' च्या माध्यमातून वरील प्रकरणाचा जो अभ्यास केला जाईल त्याच्या आधारे निष्कर्ष काढून त्याचे चिकित्सक विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची

१) यशवंतराव सायगावकर, 'मुंबईसह महाराष्ट्र व महाराष्ट्र-कर्नाटक सीमालढ्याचा इतिहास', मुक्तरंग प्रकाशन, लातूर प्रथमावृत्ती ६ जून २०१५

२) माधव कदम, 'खुरूप', भूमी प्रकाशन, प्रथमावृत्ती १ मे २००६

३) दयानंदराव बिरादार, 'घाटावरची बोरं', कैलाश पब्लिकेशन्स

४) संपा.इंदुमती सुतार-हिरवी पहाट

५) संपा.भालचंद्र शिंदे-माझी मराठी

६) सौ.सुमन वैजनाथ शेगेदार-गीतांजली, डिसेंबर २०१५

७) संपा.बाबुराव रामजी मुंगळे-विळखा

८) संपा.सर्वोत्तम सताळकर-भाव अनुबंध, जुलै २०१८

संशोधक
पाटील शितल विनायकराव

मार्गदर्शक
प्रा.डॉ.म.ई. तंगावार
मराठी विभाग
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर